# CCE PR

ಸಂಕೇತ ಸಂಖ್ಯೆ : **08-M** ವಿಷಯ : ಪ್ರಥಮ ಭಾಷೆ — ಮರಾಠಿ

**Code No. : 08-M Subject : First Language — MARATHI**

**( ಹೊಸ ಪಠ್ಯಕ್ರಮ / New Syllabus )**

**( ಪುನರಾವರ್ತಿತ ಖಾಸಗಿ ಅಭ್ಯರ್ಥಿ / Private Repeater )**

**सामान्य सूचना :**

i) प्रश्न व उत्तर पत्रिका एकत्रित आहेत. त्यात वस्तुनिष्ठ व विवरणात्मक असे एकूण 64 प्रश्न आहेत.

ii) प्रत्येक वस्तुनिष्ठ प्रश्नांच्या उत्तरासाठी दिलेल्या जागेतच पूर्ण उत्तर, संकेताक्षरासह लिहावे.

iii) विवरणात्मक प्रश्नांच्या उत्तरासाठी पुरेशी जागा दिलेली आहे. त्याच ठिकाणी आपली उत्तरे लिहिणे आवश्यक आहे.

iv) वस्तुनिष्ठ आणि विवरणात्मक प्रश्नांसमोर दिलेल्या सूचने प्रमाणे उत्तरे लिहावे.

v) विद्यार्थांनी प्रश्नांची उत्तरे पेन्सीलने लिहू नयेत, लिहिल्यास त्या उत्तरांना गुण दिले जाणार नाहीत. ( नकाशा, आकृति, आलेख व्यतिरिक्त ).

vi) या प्रश्नोत्तर पत्रिकेत दिलेल्या बहुपर्यायी, रिकाम्या जागा भरा व जोड्या जुळवा या सारख्या प्रश्नांची उत्तरे लिहिताना खाडाखोड किंवा खाणा खुणा करु नयेत, तसे केल्यास त्या उत्तरांना गुण दिले जाणार नाहीत.

vii) विद्यार्थांना पंधरा मिनिटांचा जास्त वेळ देण्यात आला आहे. त्याचा उपयोग प्रश्नपत्रिका वाचण्यासाठी करावयाचा आहे.

viii) उजवी कडील मोकळ्या मार्जिनमधील दिलेल्या जागेत कांही लिहू नका.

## विभाग - A

### ( गद्य पद्यांशावर आधारित )

I. खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा : 16 × 1 = 16

1. किल्ल्यातील भेद आणण्यासाठी कासारपण कुणी स्वीकारले ?
2. 'जपानी स्त्री' या पाठाचा वाङ्मयप्रकार कोणता ?
3. उत्तम कांबळेंचे वडील वारल्यानंतर त्यांना काय वाटले ?
4. सरकारी शाळेतील प्रार्थना गंगूबाईंना का आवडत नसे ?
5. हत्ती सुपासारखा असे कोणत्या अंधाला वाटते ?
6. श्री चक्रधरांनी म्हाईंभटास कोणत्या गावी दृष्टांत सांगितला ?
7. उत्तम कांबळे यांचे गाव कोणते ?
8. शस्त्रक्रियेचा गंगूबाईंच्या आवाजावर कोणता परिणाम झाला ?
9. मराठी भाषेतील आद्यकवी म्हणून कुणाला ओळखले जाते ?
10. श्रीकृष्णाने कोणत्या पद्धतीने आपल्याशी विवाह करावा असे रुक्मिणीला वाटते ?
11. माहेरी आंब्यांना तोटा का नाही ?
12. चि० वि० जोशी यांच्या कुत्र्याचे नाव काय होते ?
13. 'मनाचे पिंजरे' हा पाठ कोणत्या पुस्तकातून निवडला आहे ?
14. उत्तम कांबळे यांच्या आईचे नाव काय ?
15. गंगूबाई हनगल यांनी कोणत्या घराण्याची गायकी परदेशातही लोकप्रिय केली ?
16. मुकुंदराज कवितेच्या प्रारंभी कोणाचा जयजयकार करतात ?

II. खालील प्रश्नांची उत्तरे **तीन** ते **चार** वाक्यात लिहा : 13 × 2 = 26

17. ''ही कशाला धरुन आणिली'' संदर्भासह स्पष्टीकरण करा.

18. लेखकाने काकूंना कामावरुन का काढले ?

19. ''ह्या तरुण मुलींना असं एकटं रहायची भीती नाही वाटत'' संदर्भासह स्पष्टीकरण करा.

20. चांगला शकुन सांगण्यासाठी ज्ञानेश्वर कावळ्याला कोणकोणती प्रलोभने दाखवितात ?

21. 'पाहुणे' या कवितेतील आई शेवटी का गहिवरते ?

22. ग्रामीण स्त्रीच्या संसाराला अनुराधा पाटील यांनी 'वणवा' असे का म्हटले आहे ?

23. ''तो भणे हा हस्तीचा एकेकु अवयेवु होये'' संदर्भासह स्पष्टीकरण करा.

24. जपानच्या प्रगतीला कोणत्या दोन गोष्टी कारणीभूत होत्या ?

25. केशव मेश्राम यांच्या मित्राच्या घरी जेवणाचा कोणता बेत केला होता ?

26. ''पाहुणे पंढरी रावो घरा कै येती'' संदर्भासह स्पष्टीकरण करा.

27. पाहुणे कोठून आले आहेत असे आई मुलाला सांगते ?

28. ''कुणी एखादी पारू, कुणी एखादी राही''

    संदर्भासह स्पष्टीकरण करा.

29. माहेराला गोकुळ असे का म्हटले आहे ?

III. खालील प्रश्नांची उत्तरे **पाच-सहा** वाक्यात लिहा : 10 × 3 = 30

30. 'विद्या' या गुणाबद्दल आंबेडकर काय म्हणतात ?

31. "छत्री आपण दुस-यांसाठी घेतो" असे अनंत काणेकर का म्हणतात ?

32. तिसरी वाटणी कुणी मागितली ? आणि का ?

33. केशव मेश्राम यांच्या सायकल प्रवासाचे वर्णन करा.

34. धर्माच्या नावा खाली ढोंगी साधू काय काय करतो ?

35. मार्कंडेयाची तुलना कवीने देशभक्तांशी का केली आहे ?

36. कुसुमाग्रज यांचा थोडक्यात परिचय लिहा.

37. 'धरण' या कवितेतील स्त्रीला कोणकोणते कष्ट सहन करावे लागतात ?

38. बेळगावी काँग्रेस मधील घटनांचे सविस्तर वर्णन करा.

39. परमात्म्याचे वर्णन करण्यासाठी मुकुंदराज कोणता दाखला देतात ?

IV. खालील प्रश्नांची उत्तरे **आठ** ते **दहा** वाक्यात लिहा : 5 × 4 = 20

40. "हिरवे सांगाती" या पाठात कोणकोणत्या झाडांचे वर्णन आले आहे ?

41. सावित्रीबाई शिक्षिका म्हणून शाळेत जाऊ लागल्यावर लोकांनी कसा त्रास दिला ?

42. मातीची मृत्यूवर मात म्हणजे काय ?

43. शेतात राबणा-या माऊलीचे व मुलाचे वर्णन विठ्ठल वाघ यांनी कसे केले आहे ?

44. खालील कवितेच्या ओळी पूर्ण करा.

खलनिंदका मनीही ........................................

.............................................................

.............................................................

.............................................................

........................................... वरचि असा दे.

## विभाग - B
## ( व्याकरणावर आधारित )

V. खाली दिलेल्या प्रश्नांना **चार** पर्याय दिले आहेत. त्यातील योग्य उत्तर निवडून लिहा :

$10 \times 1 = 10$

45. 'दिगंबर' या शब्दाचा संधी विग्रह असा होतो

(अ) दिक् + बर (ब) दिग + अंबर

(क) दिक् + अंबर (ड) दिग + बर.

46. "उद्या आम्ही बेंगळूरूला जाऊ" या वाक्यात हा काळ आहे

(अ) वर्तमान काळ (ब) भविष्य काळ

(क) भूत काळ (ड) अपूर्ण वर्तमान काळ.

47. "इकडे आड तिकडे ..........." म्हण पूर्ण करा.

(अ) विहीर (ब) माड

(क) डबके (ड) ताड.

48. "अरे रे ! बिचारा साफ बुडाला" हे वाक्य या प्रकारचे आहे

(अ) विधानार्थी वाक्य (ब) प्रश्नार्थी वाक्य

(क) आज्ञार्थी वाक्य (ड) उद्गारार्थी वाक्य.

49. "स्वतःच्या पायावर उभा राहणारा" या साठी एक शब्द हा आहे

(अ) स्वावलंबी (ब) अपंग

(क) धडधाकट (ड) परावलंबी.

50. 'उंट' या शब्दाचे स्त्रीलिंगी रूप हे आहे

(अ) लांडोर (ब) उंटीण

(क) सांडणी (ड) उंटी.

51. तुझे घर कोठे आहे या वाक्याच्या शेवटी हे विराम चिन्ह वापरावे

(अ) " (ब) ?

(क) ; (ड) !

52. खालीलपैकी तत्सम शब्द ओळखा

(अ) धोंडा (ब) बटाटा

(क) पान (ड) धर्म.

53. "पक्षी आकाशात उडतात" या वाक्यात हा प्रयोग आहे

(अ) कर्मणी प्रयोग (ब) कर्तरी प्रयोग

(क) भावे प्रयोग (ड) यापैकी नाही.

54. खालील शब्दातील तृतीय विभक्तीचा शब्द हा आहे

(अ) रामाचा (ब) रामाला

(क) रामाहून (ड) रामाने.

VI. खालील पहिल्या **दोन** शब्दातील संबंध ओळखून तिस-या पदाशी संबंध जुळणारा शब्द लिहा : $4 \times 1 = 4$

55. घरोघरी : अव्ययीभाव समास : : राजवाडा :

56. निर्मला : स्वच्छ : : जननी :

57. सदाचार × दुराचार : : अवनती ×

58. दोन मुले : संख्या विशेषण : : हुशार मुलगी :

VII. सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा : $3 \times 2 = 6$

59. "ज्योतिसम समरात जळाली झाशीची राणी"

अलंकार ओळखून लक्षणे लिहा.

60. "अत्युधी पदि थोरही बिघडतो हा बोल आहे खरा" या ओळीचे गण पाडून वृत्त ओळखा.

61. खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा :

(i) पाण उतारा करणे —

(ii) पांग फेडणे —

## विभाग - C

## ( रचनेवर आधारित लेखन )

VIII. 62. खालीलपैकी कोणत्याही एकावर कल्पना विस्तार करा. $1 \times 3 = 3$

(i) आधी कष्ट मगफळ

(ii) थेंबे थेंबे तळेसाचे.

IX. 63. तुमच्या वाढदिवसाला तुमच्या गावी येण्याचे आमंत्रण देणारे पत्र तुमच्या मित्राला / मैत्रिणीला लिहा. 5

**किंवा**

तुमच्या गल्लीत वीजपुरवठा सुरळीत करण्या संदर्भात हेस्कॉमच्या अधिका-यांना तक्रार अर्ज लिहा.

X. 64. खालीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर **15** ते **20** ओळी निबंध लिहा : $1 \times 5 = 5$

(i) आई हे परम दैवत आहे

(ii) अस्पृश्यता-सामाजिक कलंक

(iii) राष्ट्रीय एकात्मता-आजची गरज.